IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

IJARSCT

Impact Factor: 7.301

Volume 3, Issue 3, January 2023

# भाववाढीचे वास्तव विष्लेशन

प्रा. एस. एस. बलखंडे
अर्थषास्त्र विभाग
सु. मो. महाविद्यालय, पोलादपूर, रायगड

भाव वाढ ही नेहमीच सामान्य मानसाच्या जिव्हळयाचा विशय राहिला आहे. सरकार कडून जेव्हा भाव वाढ निर्देषांक जाहीर केला जातो तेवहा तो जर वाढलेला असेल तर भिती र्निमाण होते , जर घटलेला असेल तर आंनद व्यक्त केला जातो, आणि स्थिर असेल तर समाधान व्यक्त केले जाते. जूलै 2009 च्या पहिल्या आडवडयात घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ दर .1.21टक्के राहीला. हा भाव वाढ दर षून्या पेक्षा खली रहील असा अंदाज तज्ञानी व्यक्त केला. ही गोश्ट गृहीत धरून धेरणे आखली जाऊ लागली ती सामान्य मानसाना सूखावणारी होती. ज्या वेळी सरकार कडून असे सांगितले जाते सरकारी आर्थिक धोरणे हे सामान्य मानसाला संरक्षण देणारी असताना आर्थिक विकासा बरोबर किंमत स्थिरता है उदिश्ट समोर ठेवले जाते.

सन 2003.04 ते 2007.08 या काळात आर्थिक विकासाचा दर हा वाढता राहिला पण भव वाढीचा दर ही 5ते6 टक्के पेक्षा खली ठेवण्यात यष आले. फिलिप्सच्या म्हणण्या नूसार एकाच वेळी भाव वाढ नियंत्रन व आर्थिक विकास हे उदिश्टये साध्य करता येत नाहीत. पण ही पाच वर्श चमत्कारीक ठरली . कारण या काळात भारतिय अर्थव्यवस्थेतिल विकास दर 8टक्के पेक्षा ज्यास्त राहीला व भाव वाढ दर सूधा खालच्या पातळीला राहीला, निष्चितच हे भारतीय आर्थिक धोरणाचे यष आहे.

वरील विधानाचा असा अर्थ निघतो की मागील पाच वर्शात आर्थिक धोरणाची कामगीरी चागली असल्याचे सांगीतले जाते पंरतू ते खरे नाही,व फक्त भास निर्माण केला जातो.त्याचा खोलवर अभ्यास केल्यावर या संदर्भातिल सत्यता लक्षात येते. भाव वाढीच्या संदर्भात जे चित्र दाखविले जाते ते खोटे आहे.वरील विधाननतिल हे खरे आहे की घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढीचा दर खालच्या पातळीला राहीला आहे.परंतूहा दर वास्तवात सामान्य माणसावरील भाव वाढीचे संपूर्ण परिणाम मोजण्यास अपयषी ठरतो.

भाव वााढ मोजण्याचा घाऊककिंमत निर्देषांक व्याापक स्वरूपाचा असला आणी सरकार कडून आर्थिक धोरणे आखताना त्याचा वापर केला जात असला तरी त्यात काही कमतरता आहेत.

**घाऊक किंमत निर्देषांकाच्या कमतरता.**

1) घाऊक किंमत निर्देषांकामध्ये सेवा क्षेत्राचा,वाटा हा निम्या पेक्षा जास्त आहे व खजगी अंतिम उपभोगातील वाटा एक तृतियांष आहे,त्या क्षेत्राचा विचार केला जात नाहीयाचाच अर्थ विविध सेवा जया सामानय माणूस उपभोग घेतो,त्याच्या किंमतीतिल वाढ घाऊक किंमत निर्देषांकामध्ये परावर्तित होत नाही.

2) घाऊक किंमत निर्देषांक हा भाराकिंत किंमत निर्देषांक आहे त्यात तिन प्रकारच्या वस्तूंचा योग्य भार विचारात घेतला जातो का? या तिन वस्तू मध्ये प्राथमिक वस्तू 22.02 टक्के,इंधन 14.23 टक्के, औद्योगिक वस्तू 63.75 टक्के. असा भर वितरीत केला जातो. प्राथमिक वस्तू म्हणजे अन्न धान्ययाला फार कमी भार देण्यात आला आहे.म्हणजेच यात सामान्य मानसाच्या वस्तूची भाव वाढ परावर्तित होत नाही.

3) निर्देषंक तयार करताना घाऊक किंमती विचारात धेतल्या जातात पंरतू सामान्य मानूस किरकोळ किंमतने खरेदी करतो.म्हणजेच सामान्य मानसाच्या वस्तूची भाव वाढ विचारात घेतली नाही.

4) घाऊक किंमत निर्देषांक यात सूधारणा कराव्या लागतात परंतू सध्या वापरात असणारा घाऊक किंमत निर्देषांक सन2000 मध्ये सूधारीत करण्यात आला होता.वापरात नाहीत अषा वस्तू वगळून सध्या वापरातिल वस्तूंचा समावेष करणे आवष्यक आहे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 3, January 2023

5) प्रा. अभिजीत सेन यांच्या कार्य गटाने आधार वर्श सन 2001.02 प्रसतापित केले हाते परंतू आकडेवारी उपलब्ध नसल्यामूळे ते वापरता आले नाही.

वर सांगीतल्या प्रमाणे घाऊक किंमत निर्देषांकात कमतरता अहेत,त्यामूळे सामान्य मानसाचे प्रतिबिंब त्या मध्ये दिसत नाही. थोडक्यात घाऊक किंमत निर्देषांक प्रमाणे भाव वाढ सामान्य लोकाना परवडेल या पातळीला ठेउण, सामान्य लोकांचे संरक्षण करवे,सव्या पध्दतिने भाव वाढ नियत्रन आहे असे सांगून दिषाभूल करू नये.भाव वाढ दर ऋण असल्याचा आंनद तेव्हाच ठरेल जेव्हा वास्तविक खरेदी षक्तीमध्ये वाढ व्होइल.

जुन व जुलै 2009 या काळात भारतिय अर्थव्यवस्थेची परिस्थिती वरच्या पेक्षा वेगळी नाही. कारण घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ दर निर्देषांक सलग पाचव्यानदा ऋण घोशित करण्यात आला. 4 जुलै 2009 संपलेल्या आठवडयात ऋण(.1.21)असल्याचे जाहीर करण्यात आले हाते. या वरून एखादया सामान्य मानसाला वाटेल की किंमती कमी होत आहेत त्यामूळे तो बाजारात जाऊन पूर्वि पेक्षा जास्त वस्तू खरेदी करू षकेल.त्या मूळे सामान्य मानसालासांगणे आवष्यक आहे की त्याला लागू होणरा भाव वाढीचा दर घाऊककिंमत निर्देषांकानूसार नसून तो किरकोळ किंमत निर्देषांकावर आधारीत आहे. किरकोळ किंमत निर्देषांकावर आधारीत भाव वाढ जो पर्यंन्त कमी होत नाही तो पर्यंन्त त्याच्या राहणीमानात सूधारणा होणार नाही.

सामान्स मानसाच्या राहणीमानावर परिणाम करणारा किंमत निंर्देषांक हा किरकोळ उपभोक्ता निर्देषांक असून, तो तिन प्रकारे तयार केला जातो.

1) औद्योगिक कामगासाठीचा निर्देषांक.
2) षेत मजूरा साठीचा निर्देषांक.
3) ग्रामिन मजूरासठीचा निर्देषांक.

औद्योगिक कामगासाठीचा निर्देषांक, षेत मजूरा साठीचा निर्देषांक, ग्रामिन मजूरासठीचा निर्देषांक या वर आधारीत भाव वाढ भारत सरकारच्या श्रम मंत्रालय जाहीर करते.

उपभेकता किंमत निद्रेषांकाचे हे तिन प्रकार तिन प्रकारच्या लोकांचे राहणीमान मोजण्यासाइी वापरतात. खलिल तक्त्या मध्ये अलिकच्या काळातिल भाव वाढ दिली आहे.

## भाव वाढीचा मासिक दर(टक्के)

| वर्श /महिना | उपभोक्ता | किंमत | निर्देषांक | घाऊक किंमत निर्देषांक |
|---|---|---|---|---|
| | औद्योगिक कामगारासाठीचा (आधार वर्श 2001=100) | षेत मजूरासाठीचा (आधर वर्श 1986.87=100) | ग्रामिन मजूरासाठीचा (आधरवर्श 19 86.87=100) | सर्वसाधरण वसतू साठीचा (आधर वर्श 1993.94=100) |
| 2008 नोव्हेंबर | 10.45 | 11.11 | 11.11 | 8.47 |
| 2008 डिसेंबर | 9.70 | 11.14 | 11.14 | 6.14 |
| 2009जानेवारी | 10.45 | 11.62 | 11.35 | 4.96 |
| 2009फेब्रूवारी | 9.63 | 10.79 | 10.79 | 3.50 |
| 2009 मार्च | 8.03 | 9.46 | 9.69 | 1.19 |

स्त्रोत्र. श्रम विभाग, श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार व आर्थिकसलागार कार्यालय,वाणिज्यव उद्योग मंत्रालय भारत सरकार.

नोव्हेंबर 2008 ला घाऊककिंमत निर्देषांक 8.47 टक्के पासून सतत घटत आहे. मार्च 2009ला तो घटत जाऊन 1.19टक्के वर पोहचला त्या नंतर घट होवून ऋण झाल्या मूळे असे चित्र रंगविण्यात आले, ज्यामूळे सामान्य मानसाला दिलासा मिळेल असे वाटले परंतू तसे झाले नाही. कारण औद्योगिक कामगारा साठीचा उपभोक्ता

किंमत निर्देषांक 8.03टक्के पेक्षा कमी झालेला नाही. षेत मजूरा साठीचा उपभोक्ता किंमत निर्देषांक 9.96टक्के पेक्षा कमी झालेला नाही. तसेच ग्रमिन मजूरा उपभोक्ता किंमत निर्देषांक 9.69टक्के पेक्षा कमी झालेला नाही.जर सामान्य मानसा साठी असणारे तिनही निर्देषांक व घाऊक किंमत निर्देषांक यात जवहपास 8 टक्के अंतर आहे. म्हणजे वास्तवात भाव वाढ कमी होत नसून सामान्य साठी भाव वाढ होत आहे हे सत्य आहे.

## सरकार कडून आता पर्यन्त राबविलेले धोरणे.

आता पर्यन्त जे धोरण राबविण्यात आले आहेत, मग ते रिझर्व्ह बॅकचे असो अथवा वित मंत्रालयाकडून असो हे सर्व धोरण ही घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढीचा दर नियंत्रनात ठेवण्यासाठी च्याच दिषेने होती. सामान्य लोकांचा उपभोक्ता निर्देषांकाकडे दूर्लक्ष केले. नोव्हेंबर 2008 च्या अगोदर घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ दरजास्त होता म्हणून सरकारी धोरणे कडक किंवा ताठर आखली होती. जेव्हा हा दर कमी व्होण्यास सुरवात झाली तेव्हा ही धोरणे सिथिल किंवा मऊ करण्यात आली.

सरकारने प्रामुख्याने अन्न धान्य वस्तू पासून सामान्य लोकांचे संरक्षण केले पाहीजे.उपलब्ध आकडेवारी नूसार भारतात सामांन्य व गरीब कुटूंबाचा 60ते70 टक्के भाग अन्न धान्य वस्तू वर खर्चकेला जातो. याचाच अर्थ असा की या कुटूंबाच्या दृश्टीने इंधन,तेल व धातू याच्या किंमती कषा बदलतात या पेखा अन्न धान्य यांच्या किंमती बाबत काय होते ते महत्वाचे आहे. परंतू आता प्रर्यन्त तेल व धातू यांच्या किंमत बदलास जास्त महत्व देण्याात कारण घाऊक किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ विचारात घेऊन रिझर्व्ह बॅक ने सौम्य पत धोरण आखले. त्या मूळे अगोदरच भाव वाढीने त्रस्त सामान्य मानसाला अधिक भाव वाढीचा सामना करावा लागला.

## सरकार कडून योग्य धोरणे राबविण्याची आवष्यकता.

भाव वाढ रोकण्यासाठी घाऊक किंमत निर्देषंका सोबतच उपभोक्ता किंमत निर्देषांक याचा सूधा विचाार व्हावा . उपभोक्ता किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ दर नियंत्रनात आनण्या साठी सरकारी धोरणे हे अन्न धान्य वस्तूचा पूरवठावर लक्ष केंद्रित करणारी असावित, कारण अषा वस्तूंची भाव वाढ ही मागणी पूरवठयाच्या असंतूलनातुन हाते.मौद्रिक धोरणे हे घाऊक किंमत निर्देषंकावर आधारीत भाव वाढ रोखण्याास प्रभावी हाते. परंतू उपभोक्ता किंमत निर्देषांक आधारीत भाव वाढ दर हा मागणी पूरवठा प्रभावित होत असल्या मूळे येथे राजकोशिय धोरण अधिक उपयूक्त ठरते. म्हणून राजकोशिय धोरणाचा योग्य तो वापर करून भाव वाढीवर नियंत्रन करावे.

सांराष रूपाने असे म्हणता येइल की भाव वाढ नियंत्रनात आनण्यासाठी योग्य त्या किंमत निर्देषांकाची निवड करावी वत्या नूसार प्रभावी ठरणारे मौद्रिक धोरण किंवा राजकोशीय धोरण राबवावे जेने करून सामान्य मानसाला त्याचा दिलासा मिळेल.

**संदर्भ:.**

[1]. कार्य गट अहवाल मे 2008 दृ
[2]. दैनिक लोकस्ताचे विविध अंक
[3]. रिझर्व्ह बॅक बूलेटिंग.
[4]. स्यूल अर्थषास्त्र .. एम एल जिंगन.
[5]. द इकॉमिक टाइम्स 13 जून.
[6]. भारतिय अर्थव्त्र्वस्था... दत्त व सूंदरम.
[7]. अर्थसंवादचे विविध अंक.